MHAU120001702025

**नियमित दिवाणी दावा क्र.–२३/२०२५**
**दिपाली वि. मनोज**

## निशाणी क्र.१३ वरील आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी त्यांच्याविरोधात झालेला दि.१०.१०.२०२५ रोजीचा लेखी म्हणणे नाहीचा आदेश बाजूस सारण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादीने सदरच्या अर्जावर त्याचे म्हणणे दाखल केले की, दि.१०.१०.२०२५ प्रतिवादी हा नाशिक येथे गेलेला असल्याने तो विहीत मुदतीत त्याचे म्हणणे न्यायालयात सादर करु शकला नाही. तरी त्यांचे म्हणणे मा. न्यायालयासमोर येणे महत्वाचे आहे, अन्यथा त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब, प्रतिवादीने त्याचेविरुध्द झालेला वरील नमुद आदेश बाजूस सारुन मिळण्याची विनंती केलेली आहे.

**०३.** वादीने नि. क्र.१५ वर त्याचे म्हणणे दाखल केले. प्रतिवादी याने सदरचा अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तीक नाही. सबब, अर्ज नामंजुर करुन, प्रतिवादी यांना कॉस्ट करण्याची विनंती केली.

**०४** प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, प्रतिवादी हा दि.१०.१०.२०२५ रोजी नाशिक येथे गेल्याचे कथन केले. तथापि, प्रतिवादी याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जात पृष्टयर्थ कोणतेही कारण नमुद केलेले नाही. मात्र, लेखी खुलासा पटलावर न घेतल्यास दाव्याचा निर्णय गुणांणवर होणार नाही. सबब, प्रतिवादी यांचा लेखी जबाब पटलावर असणे आवश्यक आहे. तसेच सदर अर्ज मंजूर करीत असताना, वादीला खर्चाची रक्कम देणे योग्य होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

**०१.** अर्ज रक्कम रुपये २००/– च्या कॉस्टवर मंजुर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादी याच्याविरुध्द झालेला आदेश, हा बाजुस सारण्यात येतो.

**०३.** सदर कॉस्ट प्रतिवादीने वादी यांना द्यावी.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2025.11.26 17:49:05 +0530

[एम. बी. पाटील]

**दिनांक :–२५.११.२०२५.**

दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
सोयगांव.